या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी
नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई
वडवणी केज परळी
पाटोदा शिरूर कासार
धारूर आष्टी माजलगाव
इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार १४ ऑगस्ट २०२४ | अंक२४८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# असे भाऊ नसलेलेच बरे: सुप्रिया सुळे यांचं सर्वात मोठं विधान; कुणाबद्दल म्हणाल्या असं?

## ‘ED नसती लावली तर...’

“समृद्धी महामार्गावर एवढं मोठं भगदाड कसं काय पडलं? देवेंद्र फडणवीस यांनी समृद्धी महामार्ग निर्माण केला आहे. दौंडला 160 ट्रेन थांबत होत्या. मात्र आता फक्त 60 ट्रेन थांबतात. मग विकास नक्की कोणासाठी करताय? देवेंद्र फडणवीस म्हणतात, मी दोन पक्ष फोडून आलो. अरे तुम्ही कॉपी करून पास झाले. ते दोन्ही पक्ष प्रेमाने नाही आले. तर ED लावली म्हणून तुमच्यासोबत गेले. ED नसती लावली तर एकजण पण तुमच्यासोबत आला नसता”, असा घणाघात सुप्रिया सुळे यांनी केला.

## ‘हे केवळ जुमलेबाज आणि खोटं बोलणारे सरकार’

“धनगर समाजाला आमच्या घराबाहेर म्हणाले होते, पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर आरक्षण देतो. दहा वर्ष झाले. त्यांनी धनगर आरक्षण दिले का? हे केवळ जुमलेबाज आणि खोटं बोलणारे सरकार आहे. हे दिल्ली समोर झुकणारे सरकार आहे. त्यामुळे आम्हाला असे सरकार नकोय”, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. “सत्ताधाऱ्यांनी राज्यातील कुठल्याही महिलेला आम्हाला मतदान केले नाही म्हणून त्रास दिला तर गाठ माझ्याशी आहे”, असा इशारा सुप्रिया सुळे यांनी दिला. “मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, आम्हाला शरद पावरांना संपवायचे आहे. पण महाराष्ट्रातील जनता शरद पवारांसोबत आहे त्यामुळे ते अशा पद्धतीने संपणार नाहीत”, असंदेखील सुप्रिया सुळे म्हणाल्या

“तुम्ही सांगेल त्या ठिकाणी, सांगेल त्या वेळेला लाडकी बहिणवरून ज्या आमदारांनी धमकी दिली त्यांच्याशी त्या विषयावर चर्चेला तयार आहे. लाडकी बहीण योजनेवरून दोन आमदार धमकी देतात. पण मला वाटतं असे भाऊ नसलेले बरे. कोणती बहीण म्हणाली की, आम्हाला योजना करा म्हणून. तुम्ही स्वतः ते जाहिर केले. राज्यातील कोणत्याही आमदाराला तुमचे पैसे घेऊ देणार नाहिर हा माझा शब्द आहे. 1500 रुपयात बहीण-भावाचे नाते विकत घ्यायला निघाले. एवढे मोठे झाले. तुम्ही सांगेल त्या ठिकाणी, सांगेल त्या वेळेला लाडकी बहीणवरून ज्या आमदारांनी धमकी दिली त्याच्याशी त्या विषयावर चर्चेला तयार आहे”,



असा घणाघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. “भाजपचे काही नेते येऊन आम्हाला एनसीपी म्हणजेच नॅचरली करप्ट पार्टी असे म्हणाले होते. मग आता त्यांच्यासोबत सत्तेत मांडीला मांडी लावून बसलेला पक्ष एनसीपी आहे. मग आता करप्ट पार्टी कोण आहे? उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 70 हजार कोटींचा घोटाळा झाल्याचे आरोप केले होते. मात्र आता ते सोबत मांडीला मांडी लावून सत्तेत बसले आहेत”, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली



# आजी माजी सरपंचांनी दिला सतिश आबा शिंदे यांना शब्द यावेळेस तुम्हीच आमदार .. यावेळेस फक्त सतीश आबा शिंदे यांचच नाव आमदार म्हणून लागेल.

**आष्टी प्रतिनिधी।** : -

आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये आज सतिश आबा शिंदे यांचा दौऱ्याचा दुसऱ्या दिवस भेटीसाठी दौरा यावेळी सरपंच उपसरपंच माजी आजी सरपंच व गावातील नागरिक म्हणाले ,आबा यावेळेस आपणच आष्टी मतदार संघाचे भावी आमदार असतान व आम्ही तुमच्या पाठीशी खंबीपणे उभा राहू असा गावकऱ्यांनी शब्द दिला, व तसेच गाव दौरा भेट सोलेवाडी येथील पोलीस भरती मध्ये निवड झालेले प्रदीप अशोक झगडे पोलिस बीड व तेजस गणेश झगडे सोलापूर SRPF निवड



झाल्याबद्दल सतीश शिंदे यांनी शुभेच्छा व कौतुक ची थाप दिली. व गावकऱ्यांना मुलांना सांगितले की आपण इतर कुठे काम न करता अभ्यास करावा ,अशीच विविध क्षेत्रांमध्ये नोकरीला लागा आपल्या गावाचे नाव रोशन करा, त्यावेळेस त्यांनी गावकऱ्यांनी सांगितले की आपण निश्चित रहा 2024 मध्ये आपण आमदार असताना व तसेच आज दौरा आंधळेवाडी,सोलेवाडी,तवलवाडी,मंगरूळ,खानापुर,रूटी,पिंपरी,केळसांगवी,कासारी,जळगांव,वटणवाडी, शिदेवाडी या गावांना भेट दिल्या. गावातील शेतकरी तरुण वर्गाच्या समस्या जाणून घेतल्या, आणि काही समस्या असेल तर मला आवर्जून सांगा असा,व सतीश शिंदे यांनी शब्द दिला, यावेळी उपस्थित सर्व गावचे सरपंच उपसरपंच माजी आजी तसेच ग्रामपंचायत सदस्य गावातील शेतकरी वर्ग युवक वर्ग ज्येष्ठ नागरिक तसेच सतीश आबा मित्र मंडळ उपस्थित होते..



# काहीही अडचण असल्यास मला फोन करा, मेसेज करा : बीडचे नूतन तहसिलदार चंद्रकांत शेळके

## तहसिलदार चंद्रकांत शेळके यांनी १३ ऑगस्ट रोजी साक्षाळपिंप्री गावास भेट

**आष्टी प्रतिनिधी :-**
दिली . साक्षाळपिंप्री येथे हनुमान मंदिरात गावातील शेतकरी व ग्रामस्थांच्या समवेत ग्राम पातळीवरील सर्व कर्मचारी यांची बैठक झाली . ग्रामस्थांच्या वतीने सरपंच सौरभ नरवडे यांनी स्वागत गेले . बैठकीत अनेक मुद्दयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली . यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नमूद केले की जिल्हाधिकारी अविनाश पाठक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडवण्यात येतील . यावेळी गावातील शेतकऱ्यांशी संवाद साधून गावात पिण्याच्या पाण्याची सोय , गावातील पाणंद रस्ते , वीजव्यवस्था , रास्त धान्य दुकानदार मार्फत धान्य वाटप होते का नाही व इतर विषयावर चर्चा केली . ग्रामपातळीवरील सर्व कर्मचारी व्यवस्थित काम करतात की नाही याबाबत चौकशी केली . उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांची कामे वेळेवर करणे बाबत सूचना दिल्या . हर घर तिरंगा महोत्सव उत्साहाने



साजरा करण्याचे आवाहन केले . तसेच काम असल्यास मला फोन करा , व्हाट्सॲप वर मेसेज करा , असेही आवाहन यावेळी त्यांनी केले . रास्त धान्य दुकानदार साक्षाळपिंप्री श्रीमंत नरवडे यांना वेळेवर धान्य वाटप करणे बाबत सूचना दिल्या . याठिकाणी माहिती घेतली असता शेतकरी कार्डधारक असून 110 पैकी 57 कार्ड धारक यांना अन्नधान्याच्या मोबदल्यात त्यांच्या खात्यावर शासनामार्फत रक्कम जमा झाली असल्याचे कळले . उर्वरित 53 कार्ड धारक यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यावर पुरवठा विभागाला तात्काळ कार्यवाही करणेबाबत कळविले . त्यांनतर तहसिलदार शेळके यांनी जिल्हा प्राथमिक शाळा साक्षाळपिंप्री येथे भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला .

मुख्याध्यापक व शिक्षक यांना विद्यार्थ्यांना दर्जादार शिक्षण देऊन आदर्श विद्यार्थी निर्माण करण्यासाठी सूचना दिल्या . त्यानंतर गावातील पाणंद रस्त्याची पाहणी केली . साक्षाळपिंप्री ते नारायणगड पाणंदरस्त्याची शेतकऱ्यांसमवेत पाहणी करुन सदर रस्ता खुला करणे कामी सूचना दिल्या . त्यानंतर बहादरपूर ते शेळके वस्ती रस्ता पाहणी करुन तक्रारदार व अर्जदार यांना नोटीसा बजावून नियमानुसार तात्काळ कारवाई होईल असे नमूद केले . वरील सर्व गावातील अडी-अडचणी तहसिलदार शेळके यांनी पाहणी करुन व गावाला भेट दिल्यामुळे गावातील ग्रामस्थ व शेतकरी गोरगरीब जनता यांनी तहसिलदार यांचे व सोबतच्या अधिकारी कर्मचारी यांचे आभार मानले .

यावेळी सोबत नायब तहसिलदार प्रशांत सुपेकर व पुरवठा विभागाचे निरीक्षक संतोष मुळीक , अव्वल कारकून श्रीराम वायभट , पारगाव सिरसच्या मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ , पारगाव सिरसचे तलाठी विजय बहिर , साक्षाळपिंप्री चे तलाठी यशवंत सानप , साक्षाळपिंप्रीचे उप सरपंच अंकुश काशीद , शिवाजी नरवडे , ज्ञानेश्वर काशीद , पार्वती काशीद , गोरख काशीद , बंडू काशीद , त्रिंबक शेळके , सुरेश काशीद , बहादुरपूरचे सरपंच दत्तात्रय कोळेकर , निलेश वाघमोडे , गणेश कोळेकर , जयदत्त माने , गावातील प्रतिष्ठीत नागरीक, शेतकरी व ग्रामस्थ महिला बहुसंख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचे ऊस बिल अदा करा अन्यथा संभाजी ब्रिगेड आंदोलन करणार

आपल्या लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना येथे मागील सन २०२२-२३ चे १४९ रू प्रती टन प्रमाणे रक्कम शेतकऱ्यांना देण्यात येण्याचे अश्र्वासन देऊन सुद्धा अजूनही ते बिल शेतकऱ्यांना मिळालेलं नसून सन २०२३-२४ च्या गाळप हंगामातील शेवटच्या पंधर वाडा मधील शेतकऱ्यांना कोणतेच बिल मिळाले नाही, शेतकऱ्यांची आर्थिक परस्थिती नाजूक असून अनेक शेतकरी वर्गावर उपासमारी ची वेळ आलेली असून,शेतकऱ्यांना खत,बियाणे,औषध अनेक दुकानदार यांचे उधारी पैशे देणे बाकी आहेत, अनेकांचे लग्न मोडत आले



आहेत, आत्महत्या करण्याची वेळ शेतकरी बांधव यांच्या वर आली आहे.आपण दोन्ही हंगामातील बिल लवकर अदा कराल अशि अपेक्षा आम्ही ठेवतो.आपल्या कारखण्या वरील जन सामान्य शेतकऱ्यांचा विश्वास आपण मोडू देणार नाहीत हीच अपेक्षा, लवकरात लवकर ऊस बिल अदा करण्यात यावे अन्यथा शेतकऱ्यांच्या न्याय हक्का साठी संभाजी ब्रिगेड तीव्र आंदोलन करेल. निवेदक विजय दराडे जिल्हाध्यक्ष संभाजी ब्रिगेड,तुकाराम नावडकर तालुकाध्यक्ष माजलगाव, अण्णासाहेब सोळंके जिल्हा कोषाध्यक्ष,केशव घायतिडक जिल्हाध्यक्ष दिव्यांग आघाडी,लक्ष्मण काशीद तालुका उपाध्यक्ष

## सरस्वती अध्यापक महाविद्यालयात ध्वजारोहण



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटनांदेड-किनवट : भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती जनतेच्या मनात तेवत राहाव्यात आणि देशभक्तीची जाज्वल भावना कायमस्वरुपी त्यांच्या मनात राहावी यासाठी १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, खासगी आस्थापना आणि प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकविण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले असून दि.१३-ऑगस्ट रोजी किनवट येथील सरस्वती अध्यापक महाविद्यालयात हर घर तिरंगा या शासनाच्या संकल्पनेप्रमाणे राष्ट्रीय तिरंगा ध्वज्यास मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ.पाईकराव प्राचार्य आनंद सरतापे प्रा. रुपेश कांबळे यांच्यासह प्राध्यापक प्राध्यापिका विद्यार्थी उपस्थित होते.

## ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय खेळणी वाटपाचे आयोजन

सिरसाळा : आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती , महाराष्ट्र शासन प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त अंगणवाडी दिंद्रूड ( ता . माजलगाव ) येथे बालकांना शालेय खेळणी साहित्याचे वाटप करण्याचे आयोजन करण्यात आले आहे . दिनांक १६ ऑगस्ट रोजी पंकज घाडगे व त्यांचे शरयु उद्योग समूह पुणे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. ओमप्रकाश शेटे यांना देवदूत



म्हणून ओळखले जाते, शासनाच्या आरोग्य विभागाचे कार्य करत असतांना हजारो लोकांना कमी अथवा विना खर्च उपचार मिळवून दिले आहेत. अशा सेवातत्पर व्यक्ती बद्दल सामाजिक उपक्रमाने कृतज्ञता व्यक्त करणे उचित ठरणारे आहे. म्हणून पंकज घाडगे यांनी दिंद्रूड येथील अंगणवाडीतील बालकांना शालेय खेळणी वाटपाचे आयोजन केले आहे .

## करचुडी गायरान धारकांना ७/१२ द्या अन्यथा धुळे- सोलापूर हायवे चक्काजाम आंदोलन करू-जयसिंग वीर

**बीड । प्रतिनिधी**
करचुंडी येथील गायरानधारक ग्रामस्थांनी २० जुलै पासून गावातच धरणे आंदोलन सुरू केले आहे.ग्रामस्थ एकत्र येऊन हा सामूहिक लढा लढत आहे. हे आंदोलन जवळपास २५ दिवसा पासून सुरूच आहे. याची दखल न घेतल्याने येत्या आठ दिवसात चक्काजाम आंदोलन करणार आहेत अशी माहिती जयसिंग वीर यांनी दिली आहे. प्रशासनाने याची दखल घेतलेली नाही. आमदार व खासदार देखील याची दखल घेतली नाही किंवा भेटे देखील दिली नाही. इथून पुढे आमदार खासदार





यांना गावबंदी करणार, गायरान धारकांना सातबारा भेटल्यानंतर विविध शासकीय योजनेचा फायदा घेता येतो, त्यासाठी हे आंदोलन सुरु आहे. गायरान धारकांना सातबारा भेटावा यासाठी प्रशासनाचे लक्ष वेदनासाठी धुळे सोलापूर महामार्गावर चक्काजाम आंदोलन करणार असल्याची माहिती आंदोलन प्रमुख जयसिंग वीर यांनी सांगितली आहे. आंदोलक हे आता आक्रमक पवित्रा घेणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी बोलताना सांगितली, यावेळी गावातील समस्त गायरानधारक उपस्थित होते.जोपर्यंत सातबारा आमच्या नावाने होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहील अशी माहिती जयसिंग वीर व समस्त गायनधारक यांच्याकडून सांगण्यात आली आहे.

# माऊली दादांच्या समाधीला आलिंगन दिले की मुक्ती मिळतेच नाना महाराज कदम यांचे प्रतिपादन...

## देशातून चाकरवाडीमध्ये लोक दादांच्या चरणी लीन होण्यासाठी येतात.. महादेव महाराज तात्या आणि लक्ष्मण महाराज मेंगडे हे राम लक्ष्मण आहेत.

**वडवणी,दि.१२(प्रतिनिधी):-**
बीड प्रतिनिधी - विसाव्या शतकातील महान संत विभुती वै. ह. भ. प ज्ञानेश्वर माऊली महाराज श्री क्षेत्र चाकरवाडीकर यांच्या कृपा आशिर्वादाने आणि ह भ प गुरुवर्य तपोनिधी शांतीब्रह महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताह व गुरूवर्य तपोनिधी बाळनाथ महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने दिनांक 12 ऑगस्ट रोजी ह. भ. प नाना महाराज कदम ( निनगुर ) यांची पाहिल्या दिवसाचे किर्तन पुष्प संपन्न झाले. महाराजांनी संत एकनाथ महाराज यांचा अभांगवर चिंतन केले. शिवनाम उच्चारा। तेणे कळीकाळसी दरारा ॥ ऐसा नामाचा महिमा। न कळेची आगमा निगमा ॥ सकळ मंत्राचे माहेर। शिवमंत्र पंचाक्षर ॥ एका जनार्दनी वाचे। शिवनाम जपा वाचे ॥ या अभंगातून महाराजांनी भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले. 70 वर्षानंतर हा योग येतो. पाच सोमवार येणे म्हणजे हा 70 वर्षानंतर योग येतो कारण हा महिना सोमवार पासुन सुरु होतो आणि हा महिना सोमवार या दिवशीच संपतो. सगळ्याचा मालक हा भगवान शंकर आहे. भगवान शंकर हे भोळे आहेत. भगवान शिव जी चे आपण चिंतन केले तर आपण सगळ्या देवांचे चिंतन केले असे होते. जगातील सर्वात अगोदरचे भजन हे भगवान शंकरांने केले आहे. जगातील पहिली पंढरीची वारी भगवान शंकराने केली आहे. भगवान शिव जी ने आणि पार्वती मातेने पंढरीची वारी ही पहिली केली होती. भगवान शंकर यांनी नंदिवर पहिली वारी केली. पार्वती माता ज्या ठिकाणी थांबल्या त्या ठिकाणास पद्मावती असे म्हणतात. मारुती पाटलांच्या घरासमोर भगवान शंकर यांनी नंदी ला त्या ठिकाणीस सोडले. चाकरवाडी मधील प्रसाद घेतला की तृप्ती चा ढेकर येतोच.तुम्हाला जर 24 तास अन्नदान बघायचे असेल तर चाकरवाडी मध्ये जा. देशातून चाकरवाडीमध्ये लोक दादांच्या चरणी लीन होण्यासाठी येतात. चाकरवाडी मधील लोक खूप पुण्य आहेत कारण दादांच्या दराबरमध्ये





जन्म आले आहेत. देवाकडे तुम्हाला काय मागायचे असेल तर फक्त आम्हाला परत दादांच्या चाकरवाडी मध्ये जन्माला घाल तेवढच देवाकडे माघा..अन्नदान सोबात चाकरवाडी मध्ये 24 तास भजन सुद्धा सुरु आहे. दादांचा सोपा मंत्र हा राम कृष्ण हरी हा होता. दादांच्या समाधीला आलिंगन दिले की मुक्ती मिळतेच. सोप्यातले सोपे नामस्मरण कोणते, दादांचा सगळ्यात सोपा मंत्र, पाच सोमवार असणार श्रावण महिना किती वर्षांनी येतो, 24 तास अन्नदान कुठे आहे, जगातील सर्वात अगोदर पंढरीची वारी कोणी केली अश्या अनेक विषयावर महाराजांनी भाविकांना मंत्रमुग्ध केले. महादेव महाराज तात्या आणि लक्ष्मण महाराज मेंगडे हे राम लक्ष्मण आहेत. असे यावेळी महाराजांनी आपल्या वाणीतून भाविक भक्तांना संदेश दिला. यावेळी मृदंग साथ ह. भ. प अमोल महाराज पवार चाकरवाडीकर, गायनाचार्य ह. भ. प राधाकृष्ण महाराज माखले, ह. भ. प महादेव महाराज रोडे, ह. भ. प हनुमान महाराज घोलप, ह. भ. प प्रशांत महाराज क्षीरसागर , गणेश महाराज भोसले, आविष्कार महाराज क्षिरसागर तसेच महाराज मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते. तसेच यावेळी नानासाहेब काकडे पोलिस पाटील चाकरवाडी, ज्ञानोबा अनवणे, मंचिक पवार, बाबासाहेब मोरे, माजी सरपंच चत्रभूज पवार, परमेश्वर भोसले सर, अनवणे काका, माऊली न्युज मुख्य संपादक पवार अभिजीत, चाकरवाडी ग्रामस्थ, पंचक्रोशीतील भाविक भक्त उपस्थित होते.

# माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनचे राज्यव्यापी अधिवेशन

## हजारो माहिती अधिकार कार्यकर्ते राळेगण सिद्धी येथे एकवटणार !

**बीड । प्रतिनिधी**

माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन ही महाराष्ट्रातील जागरुक नागरिकांची व माहिती अधिकार कार्यकर्त्यांची एकमेव सर्वात मोठी संघटना असून संघटनेचे राज्यव्यापी अधिवेशन दिनांक १८ऑगष्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजतापासून सायंकाळी ५.०० पर्यंत राळेगण सिद्धी ता.पारनेर जि.अहमदनगर येथे आयोजित केले असून या अधिवेशनासाठी राज्यभरातून हजारो कार्यकर्ते उपस्थित राहतील असा विस्वास माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी व्यक्त केला आहे. राळेगण सिद्धी हे माननीय अण्णा हजारे यांचे गाव असून मा.अण्णा हजारे यांचे माहिती अधिकार कायद्याचे जनक म्हणून असलेले योगदान पूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. राळेगण सिद्धी ही जागरुक नागरिक व माहिती अधिकार कार्यकर्ते यांची पंढरी असून या विकास आणि ज्ञान पंढरीमध्ये १८ऑगष्ट २०२४ रोजी राज्याच्या सर्व जिल्हे व विभागातून सुमारे पाचशे पेक्षा अधिक माहिती अधिकार कार्यकर्ते एकत्र येणार आहेत.

या अधिवेशनात कार्यकर्त्यांना मा.अण्णा हजारे यांचे प्रेरणादाई मार्गदर्शन होणार आहे.तसेच माहिती अधिकार क्षेत्रातील तज्ञ मा. विवेक वेलणकर,यशदा प्रशिक्षण संस्थेमधील माहिती अधिकार केंद्राचे संयोजक व संशोधन अधिकारी मा.दादू बुळे, तसेच यशदाच्या माहिती अधिकार प्रशिक्षका रेखा साळुंके यांचे उपस्थित कार्यकर्त्याना अमूल्य मार्गदर्शन लाभणार आहे. शासन व प्रशासन पारदर्शक व भ्रष्टाचार मुक्त असावे व त्यांत नागरिकांचा सहभाग



असावा या उदात्त हेतूने मा.अण्णा हजारे व अन्य समाजधुरीणांच्या अविरत संघर्षानंतर माहिती अधिकार अधिनियम २००५ साली अस्तित्वात आला आहे. मात्र गेल्या काही वर्षात हा कायदा प्रभावीपणे राबवण्यिासाठी शासन व प्रशासन स्तरावर खूपच आनास्था असल्याचे दिसून येत आहे. हा कायदा प्रभावीपणे राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांनी यात सहभागी होणे व या कायद्याचा सामान्य नागरिकांपर्यंत प्रचार व प्रसार होणे ही काळाची गरज असून जागरूक व प्रमाणिक नागरिकाचा मोठा दबाव गट निर्माण झाला तरच माहिती अधिकार कायद्यांच्या अंमलबजावणीतील दोष कमी होतील. व शासन व प्रशासनातील जनतोचा सहभाग वाढून प्रशासन पारदर्शक व जबाबदारीने काम करील. या साठी माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनचे अविरत प्रयत्न चालूच आहेच असे सांगून या अधिवेशनामध्ये जागरुक नागरिकांनी व माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात सामिल व्हावे असे आवाहन माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर आणि शेखर कोलते कार्याध्यक्ष महाराष्ट्र यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजना त्रुटींची पुर्तता करुन अर्ज पुन्हा दाखल करण्याचे संबंधितांना आवाहन

**जालना** मुख्यमंत्री- माझी लाडकी बहिण योजनेतंर्गत नारीशक्ती दूत या मोबाईल ॲपवरुन ज्यांनी स्वत:चे वा अन्य लाभार्थीचे अर्ज केले असतील अशा सर्व महिला, समूह संसाधन व्यक्ती, बचतगट अध्यक्ष, बचतगट सचिव, गृहिणी, अंगणवाडी सेविका/मदतनीस, ग्रामसेवक, वॉर्ड अधिकारी, सेतू, बालवाडी सेविका, आशा सेविका, पर्यवेक्षिका (मुख्यसेविका), सीएमएम, मदतकक्ष प्रमुख यांना आवाहन करण्यात येते की, नारीशक्ती दूत ॲपमधील आपल्या प्रोफाईलला लॉगीन करून यापूर्वी केलेले अर्ज या टॅबवर क्लिक करून आपल्याद्वारे सबमिट केलेले संपूर्ण अर्जाची यादी पाहू शकता. त्यामुळे त्यामुळे पात्र



(Approved)/अंशत: रद्द (Disapproved), प्रलंबित (Pending), रद्द (Rejected) असे शेरे आणि लाभार्थीचे नाव, मोबाईल नंबर सुध्दा आपल्याला पाहता येतील.

सर्व संबंधीतांनी अंशत: रद्द (Disapproved) असलेले सर्व लाभार्थीना संपर्क करून अंशतः अर्ज रद्द होण्याचे कारण व्हियु रीजन (View Reason) हे टॅबवर बघून त्याप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता करून एडिट फॉर्म (Edit Form) हे टॅबवर जाऊन यापूर्वी केलेल्या नोंदी चुकीच्या असतील तर त्या दुरुस्त करून फॉर्म सबमिट (Form Submit) करावा. यामध्ये फक्त फॉर्म एकदाच दुरुस्त (Edit) करता येईल, याची नोंद घ्यावी. दि. 13 ऑगस्ट 2024 पर्यंत जालना जिल्हयातील 12 हजार इतके अंशत: रद्द (Disapproved) केलेल अर्ज त्रुटींची पूर्तता करुन ऑनलाईन रीसबमिट करणे प्रलंबित आहेत. तरी सर्वांनी तातडीने योग्य त्या दुरुस्त्या करून अंशत: रद्द (Disapproved) अर्ज रीसबमिट (Resubmit) करावे, जेणे करून त्यांची पडताळणी करून पात्र लाभार्थींना तातडीने लाभ देणे सोईचे होईल व कोणताही पात्र लाभार्थी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी संबंधितांना केले आहे.

## ह .भ .प .रामायणाचार्य स्वप्नाली ताई आंबटकर यांना राज्यस्तरीय आदर्श कीर्तन सेवा प्रबोधन रत्न पुरस्कार जाहीर

किनवट: संतोष मरस्कोल्हे



महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्याचे वैभव,,आंबेगाव तालुक्याचे भूषण, ह ,भ ,प ,रामानचार्य स्वप्नाली ताई आंबटकर यांनी गेल्या अनेक वर्षापासून वारकरी संप्रदायामध्ये विशेष एक ओळख निर्माण केली आहे, किर्तन सेवा क्षेत्रात गेल्या काही वर्षातील सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन व्यंकटेश सेवाभावी संस्थेच्या व आपल्या कार्याचा गौरव व प्रोत्साहन घेऊन व्यंकटेश बहुउद्देशी सेवाभावी संस्थेच्या वतीने. 2024 चा पुरस्कार जाहीर झाला आहे, सदरील पुरस्कार वितरण सोहळा व कार्यक्रम रविवार 25 ऑगस्ट 2024 रोजी सकाळी 11.वाजता. डॉ, बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन स्टेशन जवळ पुणे या ठिकाणी होणार आहे. स्वप्नाली ताई आंबटकर यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे,

## वाहतुकीचे नियम पाळा व अपघात टाळा-संजय पवार, पोलीस उपनिरीक्षक.

**उरण।प्रतिनिधी**



द्रोणागिरी स्पोर्टस असोसिएशन तर्फे केअर पॉइंट हॉस्पीटल, बोकडविरा, उरण येथे रायगड जिल्हा पातळी वरील वर्षा मॅरेथॉन स्पर्धा आयोजीत केली होती.सदर स्पर्धेत सुमारे ८०० लहान मोठ्या स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचे औचित्य साधून उपस्थित स्पर्धक पालक व नागरीक यांना उरण वाहतुक पोलीस मार्फत उरण परिसरातील अपघात टाळणे करीता उपाय / वाहतुकीचे नियम पाळणे या विषयावर प्रभारी पोलीस निरीक्षक अतुल दहीफळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय पवार यांनी प्रबोधन करून वाहतुकीचे नियम पाळा व अपघात टाळा असा संदेश दिला.वाहतूक नियम कसे पाळावे व अपघात टाळण्यासाठी काय करायला पाहिजे याची विस्तृत माहिती पोलीस उपनिरीक्षक संजय पवार यांनी उपस्थितांना दिली. वाहन चालवीणाऱ्या सर्व वाहकांनी वाहतुकीचे नियम पाळून वाहने व्यवस्थित चालवावीत. वाहतुकीचे नियमांचे काटेकोरपणे पालन करावे व अपघात टाळावे असे आवाहन केले. वाहतूक विभागाचे पोलीस उपनिरीक्षक संजय पवार हे कर्तव्यदक्ष, प्रामाणिक एकनिष्ठ तत्पर पोलीस अधिकारी असून त्यांनी आजपर्यंत आपल्या शासकीय सेवेत शाळा, कॉलेज मधील विद्यार्थ्यांना,अनेक लोकांना वाहतूक नियमांबद्दल मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाखो लोकांना फायदा झाला आहे.

# जि. प. प्रा. शाळा सौंदाना येथे असर इंडीया प्रकल्प अंतर्गत शालेय चित्रकला स्पर्धा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

दि.13 ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सौंदाना येथे असर इंडिया प्रकल्प अंतर्गत महिला व बाल हवामान बदल अंतर्गत शालेय चित्रकला स्पर्धाचे आयोजन पर्यावरण सखी सौ पार्वती राजू गायके यांच्या नेतृत्वाखाली स्पर्धा घेण्यात आली.

असर इंडिया प्रकल्पांतर्गत महिला व हवामान बदल अंतर्गत शालेय चित्रकला स्पर्धा पर्यावरण सखी पार्वती राजू गायके यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हा सुविधाकार सौ.चतुरा वैजनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, माझ्या स्वप्नातील माझे गाव पर्यावरण पूरक कशी



असावी त्यात माझे योगदान काय या विषयावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सौंदाना येथे चित्रकला स्पर्धा वर्ग चौथी ते सातवी या चार वर्गामध्ये घेण्यात आली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक श्री मिसाळ सर सहशिक्षक साळवे सर कागदे सर शिंदे सर घोलप सर तसेच बडे मॅडम चव्हाण मॅडम आणि आता काय नाही जाधव मॅडम या सर्व शिक्षकांनी खूप मोलाचे सहकार्य केले. पर्यावरण सखी सौ पार्वती राजू गायके यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत 15 ऑगस्ट च्या दिवशी एका वर्गातून पहिला आणि दुसरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस दिले जाईल याची ग्वाही दिली. तसेच गावातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके तरुण मित्र मंडळ श्रीकृष्ण गायके शहादेव घोलप नारायण काकडे रामप्रसाद गायके राहुल गायके यांनीही मोलाचे सहकार्य केले.

# जुनी पेन्शन संघटनेचा १७ ऑगस्टला जिल्हाधिकारी कार्यालयावर पेन्शन क्रांती मुंडण मोर्चा

## पेन्शन क्रांती मुंडन मोर्चामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - किशोर भालेराव

**केज । सचिन भालेराव**

१ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत रुजू झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना तत्कालीन शासनाने १९८२-८४ ची जुनी पेन्शन योजना रद्द करून नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू केली आहे. ही योजना राबवताना कसल्याही प्रकारचे नियोजन न करता घाईगडबडीत शासनाने हा निर्णय घेवून कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधकारमय केले आहे. आज या योजनेला १८ पूर्ण वर्षे झाली,पण म्हणावी तशी अंमलबजावणी झाली नाही. कपातीवर आधारित असलेल्या या योजनेत एनपीएस धारकांना मात्र कसलाही शसनवाटा लाभ मिळत नाही. शासनाची व्याजाची रक्कम जमा होत नाही,तर आजवर कपात झालेल्या रकमेचाही हिशोब मिळत नाही. एकंदरीत ही नवीन पेन्शन योजना कसलाही फायदा नसलेली आहे. कर्मचाऱ्यांना कसल्याही प्रकारची सुरक्षितता नसलेली ही पेन्शन योजना आहे. शासनाच्या हस्तक असलेल्या काही संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन जीपीएस नावाची नवीन योजना पुन्हा एकदा कर्मचाऱ्यांच्या माथी मारण्याचा घाट शासन करीत आहे. नागपूर येथे झालेल्या महाआक्रोश मोर्चा नंतर महाराष्ट्र शासनाने येणाऱ्या अधिवेशनात सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करू असे आश्वासित केले होते. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने एक सुकाणू समितीची निर्मिती करून लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते, मात्र येथे सुद्धा महाराष्ट्र शासनाने चलाखी करून जुन्या पेन्शनच्या नावाखाली कर्मचाऱ्यांच्या तोंडी पाने पुसली आहेत. समितीच्या शिफारशीनुसार GPS नावाची नविन पेन्शन योजना या समितीने प्रास्तावित केली आहे. सदर योजनेचे स्वरुप NPS योजनेसारखेच फसवे असल्याचे प्रथम दर्शनी लक्षात येत असल्याने राज्यातील सर्व DCPS/NPS धारक याचा तीव्र निषेध करीत आहेत. जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करण्याचा निर्णय न घेता शासन वारंवार DCPS, NPS आणि आता GPS सारख्या फसव्या योजना सबंधित कर्मचाऱ्यांना विचारात न घेता त्यांच्यावर लादत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये शासन धोरणाविषयी प्रचंड रोष निर्माण झाला आहे. राज्यात जुनी पेन्शन योजना बंद करुन अठरा वर्षाहून अधिक कालखंड झाला असून आता अनेक कर्मचारी सेवानिवृत झाले आहेत तरी काही सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. अश्यावेळी शासनाची DCPS आणि NPS योजना पेन्शन विषयक लाभ देण्यासाठी पुर्णतः अपयशी झाली आहे. त्यातुन या नविन GPS योजनेवर कर्मचारी विश्वास ठेवण्यास तयार नाहीत. छत्तीसगड ,मध्य प्रदेश, राजस्थान, कर्नाटक,तेलंगणा , आंध्र प्रदेश यासारख्या आर्थिक दृष्ट्या कमी सक्षम असलेल्या राज्यांना सुद्धा जुनी पेन्शन योजना लागू केली मग आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि पुरोगामी असलेल्या महाराष्ट्राला हे का परवडत नाही असा प्रश्न कर्मचाऱ्यांना पडला आहे. महाराष्ट्रातील १ नोव्हे. २००५ व त्यानंतर नियुक्त कर्मचारी व अधिकारी यांची एकमेव मागणी ही सरसकट जुनी पेन्शन योजना अर्थात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) १९८४ तसेच भविष्य निर्वाह निधी (GPF) सह लागू करणे ही आहे. कर्मचाऱ्यांना सरकारची प्रस्तावित सुधारीत निवृत्तिवेतन योजना / आश्वासित पेन्शन योजना (GPS) मान्य नाही. राज्यात जुन्या पेन्शन ऐवजी GPS किंवा अन्य कोणतीही योजना आणणे किंवा लागू करणे हे कर्मचाऱ्याचे सेवानिवृत्तीनंतर भविष्य उध्वस्त करणे होईल. त्यातुन कर्मचाऱ्यामध्ये शासन धोरणाविषयी रोष वाढत जाणार आहे. जीपीएस नावाच्या फसव्या योजनेचा फटका राज्यातील 24 लाख कर्मचाऱ्यांना बसणार आहे. यामुळे महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेने 'जो देईल पेन्शन, त्यालाच निवडणुकीत समर्थन' 'वोट फॉर ओपीएस' नावाची मोहीम राबवलेली आहे. या माध्यमातून राज्यातील कर्मचाऱ्यांचा आक्रोश व्यक्त होणार आहे. त्यामुळे शासनाला जागे करण्यासाठी तसेच DCPS, NPS आणि आता GPS सारख्या फसव्या योजना कर्मचाऱ्यांवर न लादता, राज्यातील सर्व कर्मचाऱ्याना म.ना.से.बि. १९८२-८४ अंतर्गत जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करण्याचा निर्णय घ्यावा. यासाठी राज्य भरातील लाखो कर्मचारी महाराष्ट्रात वेगवेगळी आंदोलने करत आहेत. म्हणूनच बीड जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटना ,महसूल विभाग ,पंचायत विभाग ,जिल्हा परिषद ,आरोग्य विभाग ,कृषी विभाग ,आयटीआय, ट्रेझरी विभाग, पोलीस आस्थापना विभाग,आणि इतर सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी एकत्रित येऊन महाराष्ट्र शासनाच्या धोरणाच्या विरोधात पेन्शन क्रांती मुंडन मोर्चा काढत आहे. पेन्शन योजनेबाबत कर्मचाऱ्यांच्या मनात शासनविरोधात असलेल्या आक्रोश शासनापर्यंत पोहचण्यासाठी 17 ऑगस्ट 2024 वार शनिवार रोजी दुपारी 3.00 वाजता सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स चे जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे जुनी पेन्शन संघटनेचा जिल्हाव्यापी पेन्शन क्रांती मुंडण मोर्चाचे आयोजन केले आहे तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त डिसीपीएस व एनपीएस धारकांनी या महाआक्रोश मुंडण मोर्चाला उपस्थित राहुन मोर्चा यशस्वी करावा असे आवाहन महाराष्ट राज्य जुनी पेन्शन संघटना शाखा केज च्या वतीने करण्यात आले आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे



## जगताप, मुळूक यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील शिवसैनिकांचा ऐतिहासिक पक्ष प्रवेश- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप आणि सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील उबाठा सेना महिला आघाडीच्या जिल्हा संघटक तथा राज्य महिला आयोगाच्या सदस्य ॲड.संगीता चव्हाण तसेच बीड जिल्ह्याचे युवासेना जिल्हाप्रमुख गजानन कदम, युवासेनेचे जिल्हाप्रमुख ॲड. रविराज बडे आणि त्यांच्या हजारो कार्यकर्त्यांचा शिवसेनेतील प्रवेश हा ऐतिहासिक प्रवेश सोहळा आहे. बीड जिल्ह्यातून तब्बल दोन हजार महिला भगिनी आणि युवक बारा तासांचा प्रवास करून मुंबईला शिवसेनेत प्रवेश करण्यासाठी आले आहेत ही बाब पक्षाला ऊर्जा देणारी आहे अशी भावना महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष, लोकप्रिय मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्ष मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांनी पक्ष प्रवेश सोहळ्या दरम्यान व्यक्त केली.

काल दि. १२ ऑगस्ट रोजी हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर उबाठा सेनेतील महिला आघाडी जिल्हाप्रमुख तथा राज्य महिला आयोगाच्या सदस्य ॲड. संगीता चव्हाण व सर्व महिला पदाधिकारी, युवासेना जिल्हाप्रमुख ॲड. रवीराज बडे, गजानन कदम आणि त्यांच्या सर्व समर्थक कार्यकर्त्यांनी वर्षा निवास्थान मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री, शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्याकरिता बीड जिल्ह्यामधून चारशे गाड्यांचा ताफा मुंबई येथे डेरे दाखल झाला होता. मुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी या सर्वांचे पक्षात स्वागत करून त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना शिंदे साहेब म्हणाले की, अनिल जगताप यांनी काही महिन्यापूर्वी पहिल्यांदा बीडमधून पाचशे ते सहाशे गाड्यांचा ताफा मुंबईत आणून रात्री दीड वाजता आपला स्वतःचा शिवसेनेत ऐतिहासिक प्रवेश केला तर आता जगताप, मुळूक यांच्या नेतृत्व मार्गदर्शनाखाली बीडमधून मुंबईत दुसऱ्यांदा चारशे गाड्यांचा ताफा रात्री दोन वाजता येऊन शिवसेनेत ऐतिहासिक प्रवेश करत आहे



## मिनी मॅरेथॉनसाठी राष्ट्रीय कॅडेट कोअर, इतर विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

बीड, दि. 13 :- राज्यात उद्धवणाऱ्या विविध आपत्ती संदर्भात रॅली मॅरेथॉनच्या माध्यमातून जनजागृती करण्यासाठी मे. चौरंग 3, युनायटेड आऊस, मनमाळा टैंक रोड, माहिम मुंबई-16 या संस्थेमार्फत बीड येथे जिल्हा स्तरावर दिनांक 19 ऑगस्ट 2024 रोजी सकाळी 07.00 वा. रॅली / मिनी मॅरेथॉन कार्यक्रमाचे आयोजन स्थळ: अंबिका चौक, बीड ते संत सेवालाल महाराज चौक, रिलायंस पेट्रोल पंपाजवळ, बीड या ठिकाणी करण्यात येणार आहे.

या मिनी मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविणाऱ्या प्रथम 100 ते 150 स्पर्धकांसाठी संस्थेमार्फत टी-शर्ट, कॅप्स, स्नॅक्स (पाणी, केळी, बिस्किटे) वितरीत करण्यात येणार आहे तसेच पहिल्या 3 विजेत्यांना पदकांचे वितरण करण्यात येणार आहे. तरी सदरील मिनी मॅरेथॉनसाठी राष्ट्रीय कॅडेट कोअर विद्यार्थी (एनसीसी), राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी (एनएसएस), आपदा मित्र, होमगार्ड व स्काऊट गाईडचे विद्यार्थी यांना सहभागी होण्याचे आवाहननिवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, बीड यांनी केले आहे.

सदरील मिनी मॅरेथॉनसाठी स्पर्धकांनी नावनोंदणी अनिकेत काळे, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, बीड (मो.क्र. 9604959678) यांचेकडे दि. 18 ऑगस्ट 2024 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत करण्यात यावी.

## स्वातंत्र्यदिनी मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते

बीड, दि. 13:- भारतीय स्वातंत्र्याचा 78 वा स्वातंत्र्यदिन गुरुवार 15 ऑगस्ट 2024 रोजी आहे या दिवशी बीड जिल्हयाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते होत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे गुरुवार 15 ऑगस्ट रोजी सकाळी 9 वाजून 5 मिनिटानी मुख्य ध्वजारोहण होईल. या समारंभास सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

या सोहळयात सहभागी होणाऱ्या सर्वांनी राष्ट्रीय पोशाख धारण करावा तसेच 8.45 वाजेपूर्वी या ठिकाणी उपस्थित रहावे असेही आवाहन करण्यात आले आहे. या समारंभापूर्वी व नंतर अर्धा तास या कालावधीत इतर कोणताही सोहळा आयोजित करु नये, असेही आवाहन करण्यात येत आहे.

जिल्हा परिषद

बीड जिल्हा परिषद येथे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. हा कार्यक्रम सकाळी 7.45 वाजता होत आहे. याला सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे यांनी केले आहे.

## कवडगाव ते श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी पायी दिंडी सोहळा

कवडगाव प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव बुद्रुक येथील भाविक भक्त , भजनी मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने गेल्या तेरा वर्षापासून 20 व्या शतकातील महान विभूती ह.भ.प वैकुंठवासी सद्गुरु किसन बाबा महाराज गोरक्षनाथ टेकडी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पायी दिंडी सोहळा आयोजित केला जातो यावर्षी या पायी दिंडी सोहळ्याचे हे १३वे वर्ष आहे. बाबांच्या पुण्यस्मरण निमित्त या पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान दिनांक १७/८/३०२४ रोजी सकाळी ग्राम प्रदक्षिणा करून मिरवणूक व बजरंग बली चे दर्शन घेऊन प्रस्थान होणार आहे. हि दिंडी मोरेवाडी सुरडी मार्गे संध्याकाळी ताडसोन्ना येथे मुक्कामी येईल रविवार दिनांक १८/८/२०२४ लां घाटसावळी तांडा मार्गे दिंडीचा मुक्काम रात्री श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होईल दिनांक १९/८/२०२४ श्रावण शुद्ध पौर्णिमा सोमवारी सकाळी दिंडी प्रदक्षिणा होऊन ह.भ.प सद्गुरु किसन बाबा महाराज पुण्यतिथी उत्सव सोहळ्याचे काल्याचे किर्तन श्रवण करून व महाप्रसाद घेऊन दिंडीची सांगता होणार आहे . या पायी दिंडी सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी होऊन दिंडीचा आनंद घ्यावा असे आवाहन दिंडी चालक, कवडगाव ग्रामस्थ आणि भजनी मंडळ यांनी केले आहे.



## शाळा अनुदानासाठी शिक्षकांनी कुटुंबासह बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केले महाअक्रोश आंदोलन...

### शिक्षकांनी आपल्या हक्काच्या वेतनासाठी शासनाच्या उदासीन धोरणाच्या विरोधात केला आक्रोश

**वडवणी | प्रतिनिध**

महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना टप्पा वाढ देण्याचं आश्वासन विधान परिषदेत देऊन सुद्धा शिक्षण मंत्र्यांनी न पाळल्यामुळे राज्यामध्ये गेल्या ३० दिवसापासून शिक्षकांचे आंदोलने सुरू आहेत शिक्षण मंत्र्यांच्या या भूमिकेचा निषेध करण्यासाठी दि.१२ ऑगस्ट २०२४ सोमवार रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हजारो शिक्षक बांधव व शिक्षिका भगिनींनी आपल्या परिवारासह उपस्थित राहून केले महाअक्रोश आंदोलन.

याबाबत सविस्तर वृत्तांत असा की, गेल्या पंचवीस वर्षापासून महाराष्ट्रामध्ये प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांना अनुदान मिळण्याचा वनवास सुरूच आहे या काळात महाराष्ट्रातील सर्वच पक्ष सत्तेवर येऊन गेले मात्र हा प्रश्न कायमचा सोडण्याचे किंवा न्याय देण्याची भूमिका एकाही सरकारने घेतली



नाही प्रत्येक वेळी शिक्षकांनी रस्त्यावर उतरून आंदोलने केली आहेत तेव्हा कुठे टप्पा वाढ दिलेला आहे अघोषित शाळा निधीसह घोषित करणे,त्रुटी पूर्तता करून ही दोन वर्षे झाली यादी लागत नाही,वेतन अनुदान मागण्याच्या प्रश्नावर शासन शिक्षकांची सातत्याने पिळवणूक करत आहे शिक्षण मंत्र्यांनी नुकतेच झालेल्या अधिवेशनामध्ये सर्वच प्रश्न मार्गी लावण्याचा विधान परिषदेत आश्वासन दिले मात्र महिना उलटला तरीह निधी सहशासन निर्णय निर्गमित न झाल्यामुळे हजारो शिक्षक रस्त्यावर उतरले आहेत बीड जिल्ह्यात हजारो शिक्षक गेल्या २६ दिवसापासून धरणे आंदोलन करत आहेत यापूर्वी बीड जिल्हाधिकारी कार्यालय समोर भीक मांगो आंदोलन,सहकुटुंब थाळी नाद असे लक्षवेधी आंदोलने लोकशाही मार्गाने केले आहेत याचाच एक भाग म्हणून श्रावण सोमवारी १२ ऑगस्ट रोजी बीड जिल्ह्यातील हजारो शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी,शिक्षिका महिला भगिनी शासनाच्या विरोधातला आक्रोश व्यक्त करण्यासाठी सहपरिवार महाआक्रोश आंदोलन केले आहे शासनाने तात्काळ आंदोलनाची दखल घेऊन निधी सहशासन निर्णय निर्गमित करावा आचारसंहितापूर्वीच शिक्षकांचे वेतन जमा करण्याचे आदेश द्यावे नसता येणाऱ्या दिवसात आणखीन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिक्षक समन्वय संघाच्या वतीने देण्यात आला आहे. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी शिक्षक समन्वय संघाचे दत्तात्रेय चव्हाण,दीपक वडमारे,बाळासाहेब सानप,अविनाश काजळे,गणेश गुजर, महानवर सर,कसबे सर अदिजनानी परिश्रम घेतले. या आंदोलनासाठी बीड जिल्ह्यातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी आपल्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दि.23 ऑगस्ट 2024 रोजी पुणे येथे संपन्न होणाऱ्या "लोकशाहीर जागर महामेळावा"



आंबेजोगाई: (जागर लोकशाहीचा-विचार स्वराज्याचा) याची माहीती देण्यात आली व त्या साठीची आढावा बैठक घेण्यात आली या बैठकी दरम्यान तालुका व शहर पदाधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली.ही बैठक संभाजी ब्रिगेड जिल्हा अध्यक्ष शिवश्री प्रविण उत्तमराव ठोंबरे, मराठा सेवा संघाचे बीड जिल्हाध्यक्ष शिवश्री रामकिसन मस्के सर,संभाजी ब्रिगेड महिला आघाडी जिल्हा अध्यक्षा शिवमती आश्विनी ताई सिद्राम यादव यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य दिव्य स्वरुपात संपन्न झाली. या बैठकीस संभाजी ब्रिगेड उपजिल्हा अध्यक्ष परमेश्वर मिसाळ, संभाजी ब्रिगेड महिला आघाडी तालुका अध्यक्षा शिवमती सुनंदा ताई रमेश लोखंडे,बलभीम काळे सर, अविनाश निर्मळ सर, जिल्हा सचिव नारायण मुळे,तालुका कार्याध्यक्ष गोविंद हाके ,माने गोविंद ,शिवम सुरवसे,कपील टेहरे, सुशांत जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्ष (पुर्व) शिवश्री अरुण (आबा) पवार , तालुका अध्यक्ष शिवश्री सिद्राम भाऊ यादव , तालुका उपाध्यक्ष शिवश्री प्रशांत पवार , शहर अध्यक्ष शिवश्री बाळासाहेब देशमुख, शहर उपाध्यक्ष शिवश्री राहुल दवणे , शहर सचिव शिवश्री प्रेम कांबळे या पदाधिकारीची निवड करण्यात आली.

## जिल्ह्यात २६ ऑगस्ट रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू

बीड, दि. 13 :- दि. 26 ऑगस्ट 2024 मराठा, ओबीसी,धनगर व इत्तर समाजाचे, राजकीय पक्षाचे, संघटनांचे दि. 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिन रोजी, विविध प्रकारचे होणारेउपोषणे,आंदोलने, सभाचे अनुषंगाने तसेच सद्या जिल्हयात राजकीय हलचाली व घडामोडीमुळे मोर्चे, निदर्शने, आंदोलने सुरु आहेत. किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होउन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आगामी कालावधीत मराठा,ओबीसी,धनगर आरक्षण मागणीसाठी सर्व समाज अक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे. दिनांक 12 ऑगस्ट 2024 रोजीचे 00.01 वाजेपासून ते 26 ऑगस्ट 2024 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम 37 (1) (3 ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय 15 दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com